ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-V February 2013

# मूल्यशिक्षण आणि 21 व्या शतकातील आव्हाने

प्रा. श्री. पी. बी. वाघेरे,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.

**प्रास्ताविक :**

समाजाला बदलण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्येच आहे व त्यासाठी त्याचा सकारात्मक दृष्टीकोन महत्त्वाचा आहे, पडद्यामागचे त्याचे सामर्थ्य महत्त्वाचे आहे.

**वाऱ्याने पान हलते, पण पान हललेले दिसते परंतू वारा आपणास दिसत नाही.** त्याचा परिणाम दिसून येईलच असे नाही. त्याचे भान सर्वानांच असावयास हवे.

**मूल्यशिक्षणाचा अर्थ–**

बालवयात मूलांच्या मनावर जे संस्कार कोरले जातात. त्याचा ठसा आयुष्यभर त्याच्या वागण्यात, बोलण्यात, कृतीत दिसून येतो.

उदा. कुंभाराला ओल्या मातीला विशिष्ट आकार देतो येतो, पण त्याकरिता चाकाला विशिष्ट प्रकारे गती, विशिष्ट आकार दिल्यांनतरच त्याच्याकडे लक्ष केंद्रित होत असते. त्याचप्रमाणे लहान मुलांना पाहिजे तसे घडविता येते. त्यास विशिष्ट प्रकारे शिक्षण आणि संस्कार देवून शिक्षकासही लक्ष केंद्रित करावे लागते.

म्हणजेच **जून्याची कास आणि नव्याचा ध्यास** यामधील सूवर्णमध्ये काढून त्या त्या मार्गाने मूल्येशिक्षण देता आले पाहिजे **ज्या शिक्षकाजवळ ज्ञानाची शक्ती असेल, तंत्राची युक्ती असेल आणि त्याची व्यवसायावर भक्ती असेल, भक्तीवर श्रध्दा असेल तो शिक्षक मूल्यशिक्षण देण्यात कोठेच कमी पडणार नाही.**

**मूल्ये शिक्षण म्हणजे काय?**

मूल्ये शिक्षण म्हणजे एखाद्या वस्तुची, गोष्टीची वा विषयाची मनुष्याला वाटणारी किंमत म्हणजे मूल्य.

**दशमिन व सायमन**

**व्याख्या :**

अनुभवातून वर्तनाबाबत सर्वसामान्य मार्गदर्शक तत्वे प्राप्त होवू शकतात ती मार्गदर्शक तत्वे जीवनाला दिशा दाखवू शकतात त्यांना मूल्ये असे म्हणता येईल.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-V February 2013

**हेन्री जूल्स**

मूल्ये म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे काहीतरी उदा. प्रेम, दयाळूपणा, समाधान, प्रामाणिकपणा, साधेपणा, सभ्यता इत्यादी


मानवाला आदर्श किंवा उत्कृष्ट जीवन जगता येते हे मानवी जीवनाचे मूल्ये आहे. माणसाचे जीवन सुखी, समाधानी होण्यासाठी माणसाचा कल अर्थार्जनाकडे आहे. आपले जीवन अर्थपूर्ण होण्यासाठी धडपड करीत असतो. सामाजिक कुटुंबात वावरतांना मित्र, नातेवाईक यांना महत्त्वाचे स्थान देतो. अशावेळी तो विषय तत्व, व्यक्ती यांना महत्व देतो व जीवनाला मूल्ये प्राप्त करतो.

जीवनाला अंतिम ध्येयाकडे नेण्यासाठी मूल्ये ही खुपच उपयोगी ठरतात. चांगले काम? वाईट काम? हे जेव्हा समजतात तेव्हा सत्याचे दर्शन अनुभवतात. सत्य बोला, सत्याने वागा, सत्य शोधा ही शिक्षणाची मूल्ये ठरतात.

समाजाला समाज म्हणून टिकून राहण्यासाठी समाज घटकात जी मूल्ये रूजलेली असतात त्यानांच मानवी मूल्ये, नैतिक मूल्ये अथवा शाश्वत मूल्ये असे म्हणतात. उदा.

1. एकाने दूसऱ्याशी कसे वागावे? असे अपेक्षिले जाणे ती मानवी मूल्ये.
2. समाज जीवन सुरळीत चालण्याकरिता जी मूल्ये आवश्यक ती जीवनमूल्ये.

**सामाजिक मूल्ये :**





ह्या सामाजिक मूल्यांचा विचार करता किंवा ती रूजविण्यासाठी समाज जीवनात 21व्या शतकातील आव्हाने ही एक समस्या होवून बनली आहे? आजची स्थिती ही झपाट्याने बदलत जात आहे. मोठ्या प्रमाणात खेड्याकडून–शहराकडे धाव घेणारी लोकसंख्या, शेतीशिवाय इतर

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-V February 2013

व्यवसायात व नोकरीत गुंतून पडणारे लोक, निवासाच्या सुविधा, आरोग्य सुविधा–अपुऱ्या सुविधा, रोजगार, बेकारी, वाहतुकीची कोंडी, वाढत्या मद्यपानामुळे जीवनाची असुरक्षितता वाढून त्याचा परिणाम समाजजीवन व मानवी जीवनावर होतो.

सामाजिक संबंध उथळ, तात्पुरते अनितीचे होवून बसल्याने माणुस हा आत्मकेंद्री बनला. कारण त्याच्या पुढे अनेक आव्हाने आहेत.

**21 व्या शतकातील आव्हाने :**




**1. बदलती कुटुंब व्यवस्था** – एकत्र कुटुंब पद्धती होती त्यानंतर विभक्त, पती–पत्नी अर्थाजनासाठी बाहेर पडले. मुलांना पाळणाघर किंवा आयांच्या हवाली केल्याने कुटुंबातील मूल्यविषयक चिंता, चिंतन करण्यास वेळ नाही. त्यामुळे मुलांना प्रेम, सहानुभूती, आत्मविश्वास, प्रेरणा, आपुलकी, योग्य संस्कार होत नसल्याने म्हातारपणी वृध्दाश्रमाची वाट दाखविली जाते, तेही आपल्याला आव्हान आहे.

**2. व्यसनाधिनता** – तरूणपिढी विशेषतः मध्यम वर्गातील मुले फॅशन म्हणून सिगारेट, बीडी, मद्य सेवन करून व्यसनी बनतात. यातून वैफल्यग्रस्त व चूकीचे गैरसमज होवून मृत्यूमुखी पडतात. उमलती कळी कोमजून जाते. कुटुंबातील आर्थिक स्थिती खालावली जाते. राष्ट्राकरिता हातभार लावण्या ऐवजी नुकसानच करते ते आपल्यापुढे आव्हानच आहे.

**3. बेकारी (नोकरी)** – आजचा तरूण अधिकच उदासिन जाणवतो. कारण निराशेची साथ धरून चालतो. शिपाईची नोकरी का होईना, नोकरीच्या मागे धावतो. वडिलोपार्जित जमिनीत कष्ट करण्याची त्याची हिम्मत नसते. श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन ही मूल्ये त्याच्यात रूजलेली नसतात. म्हणून तर आजचा तरूण पदवीचे शिक्षण घेवून नोकरीसाठी वणवण करून,

वैफल्याचे जीवन जगून शिक्षणमंत्र्यांच्या घरासमोर स्वतःला पेटवून घेतो नाहीतर गल्लीचा दादा बनून गुडगिरी करतो. बेरोजगार नव्हे तर, शेतकरी सुध्दा कर्जापोटी आत्महत्या करतो. इतकी भयावह स्थिती आमच्यासाठी आव्हानात्मक स्वरूप धारण करते.

4. **वाढती लोकसंख्या** – लोकसंख्येचा विस्फोट झाल्याने समाजात अराजकता माजली. खून, दरोडे, मारामारी, भ्रष्टाचार, हिंसाचार होवून जणू नैतिक मूल्याचा ऱ्हास होत चाललेला आहे. यामूळे उपासमार, दारिद्रय, गरिबी, कुपोषण, गरीब श्रीमतांमधील दरी वाढत जावून दोन्हीही चोरच बनू पाहत आहेत. गरीब श्रीमत यातील फरक काय? पहिली रात्रपाळी करतो तर दुसरा दिवसपाठी करतो. दोन्हीही चोरच! हे ही एक आपल्यासमोर आव्हानच आहे. यातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. तेही एक आपल्यासमोर आव्हानच आहे.

5. **शिक्षणातील गैरप्रकार** – लोकसंख्येचे विस्फोट, नंतर ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. शिक्षणाची ही एक प्रकारची हेळसांड, दूरावस्था होवू पाहत आहे. नागपूर विद्यापीठासारखे विद्यापीठ बदनाम झाले. त्याच बरोबर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील प्राध्यापक बोगस पीएच. डी. मिळवून बदनाम झाले. यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरत आहे.

त्याच बरोबर 10 वी 12 वी परीक्षाकरिता कॉपी सारखे गैरप्रकार हे ह्या शतकातील शिक्षणाला लागलेली कीड आहे. ते एक आव्हानच आहे.

6. **राष्ट्रप्रेम** – किती सुंदर शब्द 150 वर्षे गुलामगिरी सहन करणाऱ्या भारतीयांच्या नसानसात हा शब्द भिनला पाहिजे. पण तो भिनला होता क्रांतीकारक महाननेते आणि त्यावेळची जनता. आज मात्र कारगील ऑपरेशन विजय होते तेव्हा विमान अपहरणालाही आमची मनं साथ देतं? आता पुढे काय? एवढीच उत्सुकता असते. त्यासाठी बंड करायला आम्हाला जमत नाही. एक जूटीने खेळ करायला आम्हाला जमत नाही हे तर आमचे राष्ट्रप्रेम आहे. याचा शोध आणि बोध घेण हे आपल्या पुढील आव्हानच आहे.

7. **अंधश्रध्दा** – आजही समाजात बालविवाह, सतीची चाल, अनिष्ठ चालीरिती, अज्ञानाचा फायदा घेवून फसवेगिरी, माणूस जसा प्रगत होत चालला तसा अंधश्रध्दा यांच्यावर विश्वास ठेवायला लागला आहे. विश्वचषक जिंकावा म्हणून अनेक ठिकाणी होम यज्ञ केले जातात. शेवटी काय झाले? याचा शोध घेणे हे एक आपल्या पुढे आव्हानच आहे.

8. **एड्स** – लैंगिक शिक्षण देण्याची गरज निर्माण होवू पाहत आहेत. समाजात घडणाऱ्या एकतर्फी प्रेमाच्या घटना तसेच भोगवाद बळावला गेला. अनैतिक कृत्ये होवू लागली. यामुळे

एड्स सारख्या आजाराने फैलाव करून कित्येक लोकांचे बळी घेतले आहेत. हे एक आपल्या पुढे आव्हानच आहे.

**9. परदेशाबाबतचे आकर्षण** – समाजामध्ये आढावा घेतल्या नंतर समाजातील विद्वान परदेशाकडे आकर्षिला जात आहे. मूल्ये संस्कार, जडणघडण भारतात होवून, नैतिकतेचे शिक्षण होवून बुध्दीच्या जोरावर परदेश गमन करता आहेत. बुध्दीवादी लोक भारत सोडून जात आहेत ते आपल्या पुढे आव्हानच आहे.

**10. विज्ञान तंत्रज्ञान** – विज्ञान तंत्रज्ञानाने मोठी प्रगती करून इंटरनेट सारखे माहितीचा खजिना आहे. दूरदर्शनला केबल आणि जाहिरातींचे युग म्हणून त्यांचे समर्थन करतो. नको ते बघितले जाते. त्याचा परिणाम संस्कारक्षम बाल मनावर होवून, नितीमूल्याचे शिक्षणाचे महत्व कमी होवू पाहत आहे. ते एक आव्हान आपल्यापुढे आहे.

21 व्या शतकाकडे जात असतांना वायु, जल, ध्वनी या समस्यांनी उग्र स्वरूप धारण केले आहे. ही सर्व आव्हाने तरूणांवर, समाजावर टिका नव्हे, तर तिची जाणीव होवून त्या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्याची मानसिक तयारी केली गेली पाहिजे. म्हणूनच श्रीसमर्थ रामदासांनी वर्णन केलेली रामराज्याची कल्पना भारतात अवतरण्यासाठी व समाजजीवन विकसित करण्यासाठी काही सामाजिक मूल्यांचा विचार केला गेला पाहिजे. ती अशी आत्मविश्वास, आदरातिथ्य, औदार्य, स्वार्थत्याग, क्षमाशीलता, स्वावलंबन, स्वाभिमान, समूहभावना, सद्विवेकबुध्दी, सोशिकता, भूतदया, खिलाडूवृत्ती, नम्रता, नेतृत्वगुण, निःस्वार्थीवृत्ती, निसर्ग प्रेम, प्रयत्नशीलता, गुणग्राहकता, जिद्द, धर्म, जात, भाषा या बाबत पूर्वग्रह नसणे. इत्यादी माणसाजवळ मूल्ये असतील तर रामराज्य पृथ्वीतलावर अवतारण्याला वेळ लागणार नाही परंतु याकरिता–

**21 व्या शतकात मूल्यांचे रोपण करावे.**

1. संपूर्ण साक्षरता.
2. संवदेनशील, बुध्दीमत्ता, बुध्दी ही विज्ञान निष्ठ व हृदयशील असले पाहिजे.
3. जयजवान, जय किसान, कृषि, खेडयाचे स्वास्थ व विकास.
4. कणखरपणा, आत्मविश्वास.
5. स्वावलंबन, स्वयं रोजगार.
6. लोकसंख्या शिक्षण.

7. उत्तम नेतृत्व गुण, उत्तम नियोजन व प्रशासन.
8. कृतज्ञतेची भावना, त्यासाठी पंचऋण (मातृ, पितृ, आचार्य देव भव समान).
9. नैसर्गिक साधनसंपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन.
10. रिकाम्या वेळेचा सदुपयोग.
11. कामातील नेमकेपणा, अचूकता व गती.
12. ज्ञान व विज्ञान एकमेकांना पुरक मानव प्रगतीसाठीच.
13. स्वयं अध्ययन कर्तव्य परायणता.
14. एकाग्रता, आत्मसंयम, असंग्रह (साठेबाजी, कर बुडविणे, काळापैसा).
15. सकरात्मक जीवनविषय दृष्टीकोन व प्रयत्नवाद.
16. पर्यटन व राष्ट्राच्या स्थितीची यथार्थ कल्पना.

ही सर्व 21 व्या शतकातील मूल्ये रूजविण्यासाठी बुध्दीमंथन, चर्चा, परिसंवाद, अभिरूप खेळ, अभिनय, गटअभ्यास, मूल्यसंक्रमण व संवर्धन इत्यादी विचार रूजविण्यासाठी परिस्थितीचेही भान विसरता येणार नाही कारण भारतातील अर्धिजनता दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. ती अर्धपोटी व उपाशी आहे. भरल्यापोटी तत्वज्ञान ठीक आहे. पण उपाशीपोटी विश्वमित्राने देखील कुत्र्याची तंगडी खाल्याचा दाखला आहे. तेव्हा आणिबाणीच्या काळात प्रथम, प्रत्येक तोंडाला अन्न मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे तरच मूल्यशिक्षण संक्रमण, संवर्धन इत्यादी गोष्टी शक्य होणार आहेत.

वरील प्रकारे मूल्यशिक्षण आणि 21 व्या शतकातील शिक्षणासमोर समाजातील आव्हाने पेलण्याकरिता समाजात व विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रूजविणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

1. पवार, एन.जी., मूल्यशिक्षण, नित्यनूतन प्रकाशन
2. नोकतोडे किरण, नैतिक मूल्यशिक्षण, विद्या प्रकाशन, पुणे
3. कांबळे, एन.डी. दिन तरंग मूल्यशिक्षण, विद्या प्रकाशन, पुणे.